# रोपवाटिका: स्वयंरोजगारासाठी उत्तम पर्याय

**सचिन पव्हणे**
आचार्य पदवी विद्यार्थी
व. ना. म. कृ. वि., परभणी

**डॉ. नेहा दि. काळे**
प्राचार्य
रो. श. कृषि महाविद्यालय, नेसरी

**डॉ. अतुल मुराई**
प्राचार्य
कृषि महाविद्यालय, आमखेडा



आपल्या देशातले शेतकरी शक्यतो नियोजित पद्धतीने शेती करीत नाहीत. कारण मुळात असे नियोजन करावे लागते याची जाणीव नाही. त्याचबरोबर शेती नियोजनबद्धपणे करण्याचे ठरवले तरी त्यात अनेक अडथळे येतात. निसर्गाची अडचण असतेच, पण नियोजनबद्ध शेतीमध्ये पैशाची अडचण सुद्धा मोठ्या प्रमाणावर येते. त्यामुळे कोणत्या हंगामात नेमकी कोणती पिके घ्यावीत याचे काटेकोर नियोजन करणे त्यांना जमत नाही. त्यामुळे ज्या पिकांची लागवड करण्याआधी काही विशिष्ट दिवस पूर्वी रोपे टाकावी लागतात त्या पिकांची लागवड करण्यासाठी आवश्यक अशी रोपे टाकलेली नसतात. कोणत्याही पिकाचे किमान दीड महिना आधी नियोजन केले तर स्वत:च स्वत:ची रोपे तयार करता येतात आणि तीच रोपे वापरून पीक घेता येते. मिरची, टोमॅटो, कांदा यांची रोपे अशी टाकावी लागतात. परंतु बहुसंख्य शेतकरी नियोजन करीत नसल्यामुळे ते दुसऱ्यांच्या रोपांवर अवलंबून राहतात. अशा शेतकऱ्यांना रोपे पुरविण्याच्या निमित्ताने काही शेतकरी नर्सरी किंवा रोपवाटिका हा व्यवसाय करू शकतात. या व्यवसायामध्ये उत्पन्न चांगले मिळते.

फळझाडांची अभिवृद्धी करून त्यांची काही काळ काळजीपूर्वक संगोपन करण्यात येणाऱ्या ठिकाणास "रोपवाटिका" असे म्हणतात. भारतात रोपवाटिकांचा व्यवसाय फार जुना आहे. रोपवाटिकेतून जातीवंत रोपाची, कलमाची आणि बियाणाची उत्पत्ती, रोपाचे शास्त्रोक्त पद्धतीने संगोपन व संवर्धन निरनिराळ्या अभिवृद्धीतून एकत्रीत समुहाने केलेले असते. तिला रोपवाटिका असे म्हणतात.वनस्पतीची अभिवृद्धी हे शास्त्र आणि कला यांचा संगम अथवा मिश्रण आहे. चांगल्या झाडाच्या बियापासून चांगली झाडे तयार होतात, हे निसर्गाने आपल्याला शिकवले आहे. बियापासून वृद्धी करण्याचे काम मानवाच्या ध्यानात आल्यानंतर काही काळात त्याच्या असेही लक्षात आले कि, बियापासून वाढविलेली सर्व झाडे एकसारखी वाढत नाहीत आणि फळांच्या गुणवत्तेतही फरक पडतो. गुटी कलमाचा शोध आणि वापर सर्वप्रथम चीन देशात लिचीच्या झाडावर झाला भारतात कंदमुळापासून अभिवृद्धी करण्याचे तंत्र रामायण काळापासून अवगत आहे.

आंबा भेटकलमाची कल्पना मोगलांनी भारतात आणली तर मोसंबीत डोळे भरण्याची कला पोर्तुगीजांनी वृद्धिंगत केल्याचेही नमूद करण्यात आले आहे. उतीसंवर्धन आणि जैविक तंत्रज्ञान शास्त्राने आता चांगलीच गती घेतली असून पुढील काळात जवळजवळ सर्वच फळझाडे शाखीय अथवा सूक्ष्म पद्धतीने अभिवृधीत केली जातील असे वाटते.

### रोपवाटीकेचे फायदे:

- कमी जागेत मोठ्या प्रमाणावर रोपे तयार करता येतात.
- फळबागा लावण्यास एक प्रकारचे प्रोत्साहन मिळते.
- रोपावरील किडी व रोगाचे नियंत्रण करणे सोईचे होते.
- रोपवाटिकेतून आपणास आयती कलमे-रोपे उपलब्ध होत असल्यामुळे स्वत: कलमे रोपे न करता फळबागा लावता येतात.
- कलमे रोपे तयार करण्यासाठी वेळ, पैसा व श्रम वाया जात नाहीत.
- कलम रोपांच्या गुणवत्तेची खात्री असल्याने शंका राहत नाही.

- दुर्मिळ कलमे सहजासहजी उपलब्ध होऊ शकतात.
- सावकाश वाढ होणाऱ्या झाडाचे रोपवाटिकेत चांगल्याप्रकारे संगोपन करून ती लागवडीसाठी वापरता येतात.

### रोपवाटीकेची गरज:

आजकाल प्रत्येकाला आपल्या नोकरीसह एखादा जोड व्यवसाय असावा, असे वाटते स्वत:चा व्यवसाय सुरु करण्याचे अनेक पर्याय आपल्याला मिळतील. ज्यापैकी एक "नर्सरी" व्यवसाय देखील आहे. अलीकडे फळांची मागणी वाढत आहे. विविध प्रकारचे नवीन फळझाडेही लागवडीसाठी येत आहेत. तंत्रज्ञान विकसित झाल्यामुळे आंतरदेशीय बाजारपेठांचे जाळे अधिक बळकट होत आहे.

महाराष्ट्र आणि इतर राज्यातूनही रोजगार हमी योजना, फळबाग लागवड योजना, वृक्ष लागवड योजना, औषधी वनस्पती वृद्धी योजना यासारख्या योजना राबविल्या जात आहेत. कोरडवाहू फळपिके, क्षारयुक्त जमिनीत लागवड, डोंगर उतारावर लागवड यामध्ये वाढ होत आहे आणि यामुळे रोपवाटीकेंची गरज वाढत आहे. आज मागणी आणि पुरवठा यात बरच अंतर आहे.

### रोपवाटिका प्रस्थापित करताना पुढील बाबी विचारात घ्याव्यात:

- कोणत्या प्रकारची रोपवाटिका प्रस्थापित करावयची आहे?
- किती कालावधीत रोपवाटिका कार्यरत ठेवायची आहे?
- किती कलमे-रोपे उत्पादित करावयाची आहे?
- किती जमीन हवी आहे?
- पाणी
- रोपवाटीकेसाठी मजुरांची उपलब्धता कशी आहे?
- मातृवृक्ष
- कलमे-रोपे करण्यासठी निवारा, आडोसे, गृहे.
- खुंट-रोपे वाढविण्यास जागा.
- कलमा-रोपांना हार्डनिंग करणे.

### महत्त्वाच्या पिकांची अभिवृद्धी करण्यासाठी लागणारी खुंट रोपे:

- आंबा: ओलर, बाप्पाकई, चंद्रकरन, कुरुक्कन, गोवा बेल्लरी.
- संत्री/ लीम्बुवर्गीय: जांभिरी, कर्णखट्टा, क्लिओपात्रा, रंगपूर लाईम.
- द्राक्षे: डॉग्रीज, जॉर्ज.
- पेरू: सफेदा, फ्लोरिडा.
- चिकू: खिरनी, पाला.
- फणस: रुद्राक्षी.

### महत्त्वाच्या पिकांची अभिवृद्धी पद्धत:

- आंबा: कोयकलम, शेंडाकलम.
- चिकु: शेंडाकलम, भेटकलम, दाबकलम.
- द्राक्षे: फाटे कलम, डोळेभरणे, खोगीरकलम.
- पेरू: दाबकलम.
- केळी: मुनवे, कंद, उतीसंवार्धीत.
- संत्री, पपनस, जायफळ: डोळे भरणे.
- पापई, सुपारी, नारळ: बियापासून
- काजू, फणस: शेंडा कलम.
- पापई, सुपारी, नारळ: बियापासून.
- स्ट्रॅाबेरी: रनर्स.
- अननस: मुनवे.
- मिरी: फाटे कलम.
- सर्व भाजीपाला: बियापासून

### रोपवाटीकेशी संबधित अनुदानाची माहिती:

- राष्ट्रीय बागवानी मंडळ:

प्रकल्प किमतीच्या २०% अनुदान (कर्जाशी संलग्न अनुदान) रु. २५,००,०००/- पर्यंत ४ हे. क्षेत्रासाठी.

- एकात्मिक बागवानी विकास अभियान:

४ हे. क्षेत्राच्या हाय-टेक नर्सरी साठी रु. २५,००,०००/- प्रती. हे. असा खर्च अपेक्षित धरून प्रकल्प किमतीच्या ४०% अनुदान दिले जाते. जास्तीत जास्त अनुदान रु. ४०,००,०००/- प्रती रोपवाटिका.

मुख्य अट: कमीत कमी ५०,००० कलमे प्रती वर्ष हेक्टर तयार करणे आवश्यक आहे.

- लघुरोपवाटीका:

१ हेक्टर क्षेत्रासाठी. रु. १५,००,०००/- प्रती हेक्टर असा खर्च अपेक्षित आहे आणि त्यासाठी कमीतकमी रु. ७,५०,०००/- प्रती रोपवाटिका असे अनुदान दिले जाते.

मुख्य अट: कमीत कमी २५,००० कलमे प्रती वर्ष हेक्टर तयार करणे आवश्यक आहे.

- प्रमाणिकरण करण्याच्या दृष्टीकोनातून रोपवाटीकेचे आधुनीकीकरण करण्यासाठीचे अनुदान:

४ हे. क्षेत्रासाठी रु. १०,००,०००/- पर्यंत अनुदान दिले जाते. खाजगी रोपवाटिका धारकांसाठी ५०% म्हणजेच ४ हे. क्षेत्रासठी रु. ५,००,०००/- पर्यंत अनुदान दिले जाते.

उत्पादनाचा दर्जा कायम राखण्यासाठी दर्जेदार कलमांची आवश्यकता असते. महाराष्ट्र शासनाने रोपवाटिका व्यवस्थापनातून ग्राहकांची, शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये व महाराष्ट्र राज्य फळपिक उत्पादनात तसेच कलमे रोपे निर्मितीत अग्रेसर राहावे म्हणून १९७६ साली महाराष्ट्र फळांचे रोपमळे नियम हा कायदा राज्यभर लागू केला आहे. या कायद्याअंतर्गत कलमांची निर्मिती, चांगल्या दर्जेदार मुळकांडांचा वापर विवक्षित फळांच्या रोपांची आयात, निर्यात किंवा परिवहन तयार होत असलेल्या कलमांची नोंद ठेवणे या सर्व बाबींवर नियंत्रण केले जाते.

(संपर्क: +९१ ८८०८८२६९४२)

★ ★ ★